# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

**दिनांक २१/०२/२०२२ (सोमवार)**

**(सायंकाळ)**

---

### पळवून नेणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल

**पो.स्टे. एमआयडीसी बोरी** – अंतर्गत गागांपुर झोपडटटी टाकळघाट ता.हिगणा जि.नागपुर येथे दिनांक १९/०३/२०२२ चे १०.०० वा. चे सुमारास फिर्यादी नामे– कौशल रघुनाथ पाल वय ४० वर्ष रा. करमदिया, पोस्ट करमदिया ता.रामपुर जि.सिधी (म.प्र.)थाना चौराट हमु.गागांपुर झोपडपटटी टाकळघाट यांचा मुलगा नामे– राधे कौशल पाल वय १४ वर्षे ह.मु.गागांपुर झोपडपटटी टाकळघाट हा वडीलाचे रखवालीत असतांना अज्ञात आरोपीने फुस लावून पळवून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. एमआयडीसी बोरी येथे आरोपीविरुध्द कलम ३६३ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक रामेश्वर राय मो.क्र. ९९२३४२४७६७ हे करीत आहे.

### शारीरिक व मानसिक छळ करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

**पो. स्टे. काटोल** :– फिर्यादी नामे– सौ प्रगती श्रेयस गावंडे रा. कडू ले आउट वाढोणा रोड पंचवटी काटोल व आरोपी नामे– १) पति– श्रेयस देवराव गावंडे यांचे रितीरिवाजाने लग्न झाले असुन आरोपी क्र. १ याने प्लॉट विकत घेण्यासाठी ५०,००,०००/–रू. फिर्यादीला आई–वडिलां कडुन आणण्यासाठी मानसिक व शारीरिक त्रास देत होते. तसेच फिर्यादीचे सासरे आरोपी क्र. २) देवराव हुमाजी गावंडे दोन्ही रा. प्लॉट नं. १४६, छत्रपती नगर, वर्धा रोड नागपुर यांनी हुडंयाच्या कारणावरून फिर्यादीसोबत झगडा–भांडण करून 'तु इथे रहायचे नाही व तु श्रेयसला सोडचिठठी दे नाहीतर तुला आम्ही जिवानीशी मारू' अशी धमकी दिली व मारझोड केली. याबाबत फिर्यादीने राणाप्रताप पोस्टे नागपुर शहर येथे तक्रार दिली होती. त्या तक्रारी वरून नागपुर शहर येथे अदखलपात्र गुन्हा क्र.६५४/२१ कलम ३२३,५०४,५०६ भादवी चा नोंद केला. तसेच फिर्यादीने राणाप्रताप पोस्टे नागपुर शहर येथे तिचे सासऱ्या विरूद्ध पोस्टे ला अप.क्र.८१/२२ कलम ३५४(अ) भादवी चा गुन्हा दाखल केला होता. तरी सुध्दा फिर्यादीचे पती व सासरे फिर्यादीला मानसिक व शारीरिक त्रास देत होते. तसेच काटोल येथे महीला समुपदेशक केंद्र काटोल येथे त्यांची तडजोड झाली नाही.

सदर प्रकरणी फिर्यादीचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. काटोल येथे आरोपीतांविरुध्द कलम ४९८ (अ), ३२३, ५०४, ५०६ भादंवी. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला असून आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार चव्हाण मो.क्र. ९५४५३६३१२१ हे करीत आहे.

## अपघातात मृत्यु

**पो.स्टे. उमरेड** :— अंतर्गत १५ कि.मी. अंतरावरील मौजा चक्किघाट शिवार येथे दिनांक २०/०३/२२ वे २०/०० वा. सुमारास मौजा नागपुर उमरेड रोड वरील चक्कीघाट जवळ समोरून विरूध्द दिशेने येणा—या अज्ञात वाहन चालकाने आपले ताब्यातील वाहन विरूध्द दिशेने चालवुन तसेच भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन समोरून येणा—या एमएच— ४९/बिजी— ९७०५ क्रमांकाच्या मोटरसायकला धडक दिली. या अपघातात मोटरसायकल चालक नामे— निखील जितेंद्र नारनवरे (जखमी) वय ३० वर्ष रा. जरीपटका नागपुर हा जखमी झाला. तर मागे बसलेला जखमीचा आतेभाउ नामे— अखिल मुरलीधर रामटेके (मृतक) वय २६ वर्ष रा. जरीपटका नागपुर हा मोटरसायकल वरून खाली पडुन त्याचे डोक्याला व डावे डोळयाजवळ मार लागुन जखमी झाला. त्यास अपचाराकामी ग्रामीण रूग्णालय उमरेड येथे नेले असता डॉक्टरांनी तपासुन मृत घोषित केले. मोटरसायकल चालक अखिल मुर्लीधर रामटेके यास डोक्याला व हनवटी जवळ मार असल्याने व त्याला पुढील उपचाराकरीता नागपुर मेडीकल कॉलेज येथे रेफर केले.

सदर प्रकरणी सरतर्फे सरतर्फे ईश्वर जोधे पो.स्टे उमरेड यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. उमरेड येथे आरोपी चालकाविरुध्द कलम २७९, ३३७, ३०४ (अ) भादवी १८४, १३४ अ, १३४ बी मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस नाईक राहुल धोंडे पो स्टे उमरेड ९८२३११५३७३ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**